cmyk

SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी

संपादक : वैभव विवेक स्वामी

beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521

L/130/RNP/Renewal/2025-2026

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२१ | सोमवार, दि.२५ मे २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -21 | Monday, Dt.25 May 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....

### केंद्र सरकारचा निर्णयांचा धडाका..!

केंद्र सरकारने मागील आठवड्यात अर्थव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा, पायाभूत सुविधा, शेती, डिजिटल प्रशासन आणि रोजगार यासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. काही निर्णयांचे स्वागत होत असताना काही मुद्द्यांवर विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. आगामी निवडणुका, वाढती महागाई, बेरोजगारी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर घेतलेले हे निर्णय अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.

### शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा..!

दिल्ली - केंद्र सरकारने विविध राज्यांतील सिंचन, जलसंधारण आणि कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी मोठ्या निधीला मंजुरी दिली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलव्यवस्थापन सुधारण्यासाठी आणि उत्पादनवाढीसाठी विशेष योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाधारित शेतीकडे वळवण्यासाठी डिजिटल कृषी अभियानालाही गती देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### सायबर गुन्ह्यांविरोधात केंद्राचा मोठा क्शन प्लॅन..!

दिल्ली - देशभरात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने गृह मंत्रालय, सीबीआय आणि विविध राज्यांच्या सायबर विभागांना संयुक्त मोहीम राबवण्याचे निर्देश दिले. डिजिटल अरेस्ट, बनावट बँक कॉल, फेक केवायसी आणि आंतरराष्ट्रीय ऑनलाइन फसवणूक रॅकेटविरोधात विशेष कारवाई सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांसाठी नवीन सायबर हेल्पलाइन आणि तक्रार यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे.

### रेल्वे आणि महामार्ग प्रकल्पांना वेग..!

दिल्ली - देशातील राष्ट्रीय महामार्ग, द्रुतगती मार्ग, रेल्वे कॉरिडॉर आणि लॉजिस्टिक पार्क प्रकल्पांना गती देण्यासाठी हजारो कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये नवीन रेल्वे मार्ग, उड्डाणपूल आणि औद्योगिक कॉरिडॉर विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. विकसित भारत अभियानाचा भाग म्हणून या प्रकल्पांना प्राधान्य दिले जात असल्याचे केंद्राने स्पष्ट केले.

### युवकांसाठी रोजगार आणि कौशल्य विकासावर भर

दिल्ली - तरुणांमधील बेरोजगारीच्या मुद्द्यावरून विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना केंद्र सरकारने कौशल्य विकास आणि स्टार्टअप क्षेत्रासाठी नवीन उपक्रम जाहीर केले.आयटी, इलेक्ट्रॉनिक्स, हरित ऊर्जा आणि उत्पादन क्षेत्रात युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी विशेष अभियान सुरू करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील तरुण उद्योजकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

### राष्ट्रीय सुरक्षेवर केंद्राचा फोकस..!

दिल्ली - सीमावर्ती भागांतील सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने संरक्षण दलांना अत्याधुनिक उपकरणे आणि ड्रोन तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. संवेदनशील भागांमध्ये गुप्तचर यंत्रणांमधील समन्वय वाढवण्यासह दहशतवादविरोधी मोहिमा अधिक तीव्र करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### महागाईवर नियंत्रणासाठी केंद्र सक्रिय..?

दिल्ली - वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष यंत्रणा सक्रिय केली आहे. इंधन, डाळी, खाद्यतेल आणि भाजीपाला दर नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्य सरकारांशी समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाईचे संकेतही देण्यात आले.

### डिजिटल प्रशासनाला चालना


दिल्ली - सरकारी सेवा अधिक पारदर्शक आणि वेगवान करण्यासाठी विविध मंत्रालयांमध्ये डिजिटल प्रणालीचा वापर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. दस्तऐवज पडताळणी, ऑनलाइन मंजुरी आणि नागरिक तक्रार निवारण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवला जाणार आहे.

### निर्णय मोठे, पण अंमलबजावणी कितपत..?

बीड - केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयांमुळे विकास, रोजगार, सुरक्षा आणि प्रशासन सुधारण्याचे चित्र मांडले जात असले तरी जनतेमध्ये घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये अंतर राहणार नाही ना ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आगामी काळात या निर्णयांचा प्रत्यक्ष फायदा सामान्य नागरिकांपर्यंत कितपत पोहोचतो याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

# कर्जाच्या ओझ्यातून बळीराजाला दिलासा

## मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा, लाखो शेतकऱ्यांना फायदा..!



**मुंबई | प्रतिनिधी**

**राज्यातील शेतकऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या कर्जमाफीच्या प्रश्नावर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा करत दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. येत्या ३० जूनपूर्वी राज्यातील पात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले असून, खरीप हंगामाच्या तोंडावर हा निर्णय राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.**

राज्य सरकारच्या प्राथमिक आराखड्यानुसार, सुमारे ४० लाख ते ५१ लाख शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा थेट लाभ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही अहवालांनुसार, २ लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्याचा प्रस्ताव सरकारसमोर असून, या योजनेसाठी अंदाजे २७ हजार कोटी ते ३५ हजार कोटी रुपयांपर्यंतचा आर्थिक भार राज्य सरकारवर पडू शकतो. राज्य सरकारने या कर्जमाफीसाठी सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीककर्जाचा विचार करण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे नैसर्गिक संकट, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि बाजारातील घसरलेल्या दरांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले की, कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी पुन्हा बँकांकडून पीककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. अनेक शेतकरी थकबाकीमुळे नव्याने कर्ज घेण्यापासून वंचित राहत होते. त्यामुळे ही योजना केवळ जुने कर्ज माफ करणारी नसून, शेतकऱ्यांच्या आर्थिक चक्राला पुन्हा गती देणारी ठरू शकते, असे सरकारचे मत आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय माहिती संकलन आणि बँकांशी समन्वय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे जून अखेरपर्यंत प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यास राज्यातील शेतकरी वर्गाला खरीप हंगामापूर्वी मोठा मानसिक आणि आर्थिक आधार मिळू शकतो.

### कर्जमाफी प्रत्यक्षात कितपत फायद्याची?

तज्ज्ञांच्या मते, ही कर्जमाफी शेतकऱ्यांना तात्पुरता आर्थिक श्वास देणारी ठरू शकते. विशेषतः लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. बँकांच्या वसुलीचा ताण कमी होईल, नवीन कर्जासाठी पात्रता निर्माण होईल आणि खरीप हंगामासाठी भांडवल उभे करण्यास मदत मिळेल.

### मात्र, केवळ कर्जमाफीने शेतीतील मूलभूत प्रश्न सुटणार नाहीत ?

हे वास्तवही तितकेच महत्त्वाचे आहे. उत्पादन खर्च वाढ, हमीभावाचा प्रश्न, बाजारातील अस्थिरता, सिंचनाची कमतरता आणि हवामान बदल यांसारख्या समस्या कायम आहेत. त्यामुळे कर्जमाफीसोबतच शेतीमालाला हमीभाव, पाणी व्यवस्थापन, पीकविमा आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणेही आवश्यक असल्याचे कृषी अभ्यासकांचे मत आहे.

### सरकारचा सकारात्मक संदेश...

राजकीय दृष्टिकोनातून पाहता, महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेले मोठे आश्वासन पूर्ण करण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. सरकारने कर्जमाफीसह नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर योजना देण्याचेही संकेत दिले आहेत.

## ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी ना.पंकजाताई मुंडे यांनी घेतला पशुसंवर्धन विभागाचा सखोल आढावा



**मुंबई | प्रतिनिधी**

**पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे तातडीने भरून प्रशासकीय कामाला गती देण्याचे व ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा अधिक आधुनिक करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुसंवर्धन क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी व पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी पशुसंवर्धन विभागाची सविस्तर आढावा बैठक पशुसंवर्धन, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. यावेळी पशुसंवर्धन सचिव रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. पशुसंवर्धन क्षेत्राला नुकताच 'कृषी क्षेत्राचा दर्जा' बहाल करण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर पशुपालकांना व शेतकऱ्यांना कृषी क्षेत्राप्रमाणेच विविध सवलती, कर्ज आणि योजनांचा लाभ मिळणे सुलभ झाले आहे.

◀◀ पान २ वर

## नवी दिल्लीत महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर'ने ऊर्जापूर्ण सन्मान

**मुंबई | प्रतिनिधी**

**जगभरातील सरकारी, औद्योगिक, शैक्षणिक व संशोधन संस्थांच्या समन्वयातून ऊर्जा व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या ग्लोबल एनर्जी अँड एन्व्हायरमेंट फाउंडेशनच्या (जीईईएफ) वतीने महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा विद्युत क्षेत्रात मानव संसाधनातील कामगिरीसाठी 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने गौरव करण्यात आला.**




'जीईईएफ'च्या वतीने शुक्रवारी (दि. २२) नवी दिल्ली येथे 'जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषद-२०२६' चे आयोजन करण्यात आले. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी ८६ हजार कर्मचारी आणि सव्वा तीन कोटी वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून विद्युत सुरक्षिततेचे उपक्रम व त्यासाठी

◀◀ पान २ वर

## 'कॉकरोच जनता पार्टी'पासून इंधन दरवाढीपर्यंत आठवडाभर गाजल्या सत्तेच्या कुरघोड्या..!

**बीड प्रतिनिधी**

**देशातील राजकीय वातावरण मागील आठवडाभर तापलेले पाहायला मिळाले. केंद्र सरकारच्या धोरणांवर विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला, तर महाराष्ट्रात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका रंगली. सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टी हा शब्दप्रयोग देखील जोरदार ट्रेंड झाला. विरोधकांकडून हा टोला सत्ताधारी पक्षावर लगावण्यात आला असून, जनतेमध्येही त्याची मोठी चर्चा रंगली.**




पेट्रोल-डिझेल दरवाढीवरून केंद्र सरकार घेरलं

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांवरून केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार निशाणा साधला. जनतेच्या कमाईची हप्त्यांमध्ये लूट सुरू आहे, असा आरोप करत त्यांनी महागाईचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणला. सलग काही दिवसांत इंधन दरवाढ झाल्याने सामान्य नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचा दावा विरोधकांनी केला.

**कॉकरोच जनता पार्टी शब्दप्रयोगाने राजकारण तापलं**

देशातील सोशल मीडिया आणि राजकीय सभांमध्ये कॉकरोच जनता पार्टी हा शब्दप्रयोग मोठ्या प्रमाणात चर्चेत राहिला. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करताना हा उल्लेख केला. या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण आणखी ढवळून निघाले. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी याला लोकशाहीतील राजकीय संस्कृतीचा ऱ्हास असे म्हणत विरोधकांवर पलटवार केला.

**महाराष्ट्रात विधान परिषद निवडणुकीवरून जोरदार रस्सीखेच..**

महाराष्ट्रामध्ये विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. पुणे जागेवरून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघर्ष वाढला असून भाजपने आपली ताकद ३३३ पर्यंत पोहोचल्याचा दावा केला आहे. त्याचबरोबर सत्ताधारी पक्षातील एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेला देखील हक्काच्या वाढीव जागा हव्या आहेत याला भाजपाचा विरोध आहे त्यामुळे विधान परिषदेच्या जागेवरून सत्ताधाऱ्यांमध्ये अंतर्गत संघर्ष शिकेला जातो का जास्त संघर्ष करून आपल्या पक्षाला जागा वाढवून मिळवण्यामध्ये मित्रपक्ष यशस्वी होतात की राष्ट्रवादी आणि शिंदे

◀◀ पान २ वर

सुवर्णसंधी... सुवर्णसंधी...
वार्षिक वर्गणीदार व्हा...! वार्षिक वर्गणीदार व्हा..!!
जगभरात वाचले जाणारे अग्रगण्य
दैनिक समर्थ राजयोग आणि
साप्ताहिक शिववाणी
या वृत्तपत्राचे वार्षिक वर्गणीदार होऊन आर्थिक पाठबळ द्यावे ही नम्र विनंती...
वार्षिक वर्गणी (दोन्ही मिळून) फक्त ₹1500/-
दैनिक समर्थ राजयोग ₹1000/-
साप्ताहिक शिववाणी ₹500/-
दोन्हीही वृत्तपत्रे घरपोच उपलब्ध
( आपल्या इच्छेनुसार दोन्हीपैकी एका वृत्तपत्रांचेही वार्षिक वर्गणीदार होऊ शकता.. )
इच्छुक वार्षिक वर्गणीदारांनी खालील क्रमांकावर PhonePe द्वारे वर्गणी पाठवून नोंदणी करावी.
98 22 62 85 21
नोंदणी झाल्यानंतर वार्षिक वर्गणीदार यांनी कृपया आपला संपूर्ण पोस्टल पत्ता व पिनकोड नंबर सहित पाठवून सहकार्य करावे.
ही विनंती आपल्या सहकार्याच्या प्रतीक्षेत...
संपर्क करा...
वैभव जगदेवी विवेक स्वामी,
संपादक,
दैनिक समर्थ राजयोग / साप्ताहिक शिववाणी...
98 22 62 85 21....
आपले पाठबळ आमची ताकद समाजहितासाठी आमची बांधिलकी

## इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

### डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळावर वार्षिक १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार



**मुंबई | प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**

डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी

◀◀ पान २ वर

जगभरात वाचले जाणारे अग्रगण्य
दैनिक समर्थ राजयोग | साप्ताहिक शिववाणी
दररोज वाचा - दैनिक समर्थ राजयोग
दर सोमवारी वाचा - साप्ताहिक शिववाणी
ऑनलाईन वाचनासाठी खालील लिंकवर क्लिक करा
जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणारे अग्रगण्य माध्यम
समर्थ राजयोग - सत्य, निर्भीड पत्रकारिता आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणारे अग्रगण्य माध्यम.
सामाजिक प्रश्नांचा सखोल आढावा... निर्भीड आणि परखड मांडणी!
ताज्या घडामोडी - दिवसभरातील महत्वाच्या बातम्यांचा वेध
सामाजिक प्रश्न - समाजातील प्रश्नांची परखड मांडणी
विशेष लेख - तज्ज्ञांच्या लेखातून मार्गदर्शन
जनतेचा आवाज - तुमच्या हक्कासाठी आमची वचनबद्धता
बातम्या, जाहिराती व प्रसिद्धीसाठी संपर्क करा :
व्हॉट्सॲप : 98 22 62 85 21
ई-मेल : vaibhav11swami@gmail.com
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक
दैनिक समर्थ राजयोग / साप्ताहिक शिववाणी
"जनतेचा आवाज... सत्यासाठी सदैव तत्पर!"

cmyk